# **फळसेवाडी हितकारी संस्था** (नोंदणीकृत)

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 12 एप्रिल 1998 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासद बंधुनी सायंकाळी ठिक 4:00 वाजता उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

सभेपुढील कामे

1. दिनांक 16 मार्च 1997 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
2. सन 1997-98 या कालावधीत चिटणीसांनी केलेल्या कामाच्या अहवालास मंजूरइ देणे.
3. सन 1997-98 जमापत्र खर्चास मंजूरी देणे.
4. पुढील कालावधीसाठी कार्यकारिणीची निवड
5. पुढील कामांची रुपरेषा ठरविणे
6. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय

आपला

(सुनिल सदानंद राणे)

1. वाडीतील तरुण व होतकरू कार्यकर्त्यांनी यापुढील नवीन कार्यकारीणीच्या निवडीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
2. बहुतांश सभासदांनी आपली वार्षिक वर्गणी रु.60/- एप्रिल 1997 ते मार्च 1998 पर्यंत दिलेली नाही तरी लवकरात लवकर ती देण्याची कृपा करावी.

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 12 एप्रिल 1998
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 12 एप्रिल 1998 रोजी शिरोडकर हायस्कुल, परेल, मुंबई 400012 येथे घेण्यात आली. ही सभा गणसंख्येच्या अभावी ठिक 6:00 वाजता सुरू झाली. या सभेस एकूण 14 सभासद उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे उपस्थित होते. सभा सुरु होण्यापूर्वी वाडीतील दिवंगत अहिल्याबाई रघुनाथ राणे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री नारायण तातू राणे (शिवसेना उपनेते), श्री सुरेश प्रभु (खासदार – पर्यावरणमंत्री), श्री अंकूश मारुती राणे (पिसेकामते-सरपंच) पदी निवड झाल्याकारणे अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला.

श्री मनोहर बाळकृष्ण राणे यांनी फळसेवाडी शाळा क्रमांक 2 ला कै सखाराम आबाजी राणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक लोखंडी कपाट भेट दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. हेच कपाट श्री विजय संभाजी राणे यांनी विनामोबदला कणकवली पर्यंत पोहचविले. तसेच श्री जयवंत नाना राणे यांनी शाळापयोगी वस्तू विद्यार्थ्यांना दिल्या त्याबद्दल त्यांचेही आभार मानण्यात आले.

वाडीतील सामाजिक समस्यांवर सभेत चर्चा करण्यात आली. माननीय नामदार श्री नारायणराव राणे (महसुलमंत्री) यांच्या प्रयत्नाने नळपाणी योजना सुरू होतआहे त्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

फळसेवाडी ते बौध्दवाडी (पिसेकामते) जोडणारा रस्ता व श्री क्षेत्र माडाचे पाणी (शिळीचे पाणी) येथे होणारा बंधारा यासाठी लागणारे ग्रामस्थांचे प्रतिज्ञापत्र आजच गावी पाठवून देण्यात आले आहे. या बाबातीत  वकील काशिनाथ राणे व श्री प्रभाकर श्रीधर राणे व सह्या करणारे ग्रामस्थ या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानन्यात आले. सभेच्या चहापाण्याचा खर्च श्री आबा दिनकर राणे यांनी केला त्याचेदेखील आभार मानण्यात आले.

लक्षवेधी – संस्थेच्या सभेची उपस्थिती लक्षात घेता सर्वानुमते असे ठरले की लवकरच संस्थेची विषेश सर्वसाधारण सभा घेऊन आपल्या अशिक्षित पूर्वजांनी बांधलेली संधटना / संस्था यापुढे चालू ठेवावी की बंद करावी ? तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून आपली मते मांडावीत. विषेश सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 28 जुन 1998 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 येथे घेण्यात येणार आहे. सभासदांनी याची नोंद घ्यावी.

तळटीप – कृपया सर्व सभासदांनी आपली वार्षिक वर्गणी संस्थेकडे लवकरात लवकर जमा करावी ही विनंती.

---

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(7 to 9)